महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती


# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २३३ वे | दिनांक : १९/०८/२०२६ | वार : बुधवार

## फडणवीस दिल्लीला जाणार? अमृता फडणवीसांचा मिश्किल सवाल



**मुंबई :** राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लवकरच केंद्रीय मंत्रिमंडळात संधी मिळणार असून ते दिल्लीत जाणार असल्याच्या चर्चा सध्या राजकीय वर्तुळात रंगल्या आहेत. ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनीही याबाबत उघडपणे भाष्य केले असून, नुकतेच भाजपाच्या केंद्रीय कार्यकारिणीत झालेले संघटनात्मक बदल आणि त्यानंतर फडणवीसांचा पार पडलेला दिल्ली दौरा यामुळे या चर्चांना अधिकच उधाण आले आहे. देवेंद्र फडणवीस हे दिल्लीत आपली नवी राजकीय कारकीर्द सुरू करणार असल्याच्या या सर्व घडामोडींवर आणि चर्चांवर त्यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांना विचारणा केली असता, त्यांनी यावर अत्यंत मिश्किल प्रतिक्रिया दिली आहे.

अमृता फडणवीस म्हणाल्या, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस महाराष्ट्राचे सेवक आहेत. त्यांना इथे सेवा करू द्या. त्यांना का पाठवत आहात, त्यांना इथेच सेवा करू द्या. महाराष्ट्राची मोठी जबाबदारी त्यांच्यावर आहे. महाराष्ट्र हे देशातील मोठे राज्य आहे. या राज्याची जबाबदारी त्यांच्यावर आहे, याचा मला आनंद वाटतो, त्यामुळे ते इथे राहायला हवेत, अशा भावना अमृता फडणवीस यांनी व्यक्त केल्या आहेत.

'मंथन फॉर युवा' या कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या अमृता फडणवीस यांनी माध्यमांशी संवाद साधताना विविध विषयांवर आपले विचार मांडले. यावेळी विद्यार्थ्यांनी आयोजित केलेले 'हॅकेथॉन' आणि 'आयडीथॉन'चे प्रदर्शन पाहून आपण थक्क झाल्याची प्रतिक्रिया त्यांनी दिली. तसेच, विद्यार्थ्यांनी अतिशय कल्पकतेने तयार केलेले हे लोकोपयोगी प्रकल्प प्रत्यक्षात अमलात आणल्यास त्याचा संपूर्ण समाजाला मोठा फायदा होऊ शकतो, अशी आशाही अमृता फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केली.काँग्रेसकडून 'वंदे मातरम'चा अवमान झाल्याच्या प्रकरणावर विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना अमृता फडणवीस यांनी आपली स्पष्ट भूमिका मांडली. त्या म्हणाल्या की, वंदे मातरम हे राष्ट्रीय गीत राष्ट्रगाणबरोबर गायले जावे, असा निर्णय संसदेने घेतला आहे. संसदेत कायदा झाल्यानंतर जे लोक त्याचा आदर करत नसतील त्यांच्यावर कारवाई व्हायला हवी. तसेच, काँग्रेसने आपल्या कार्यक्रमात पूर्वीचेच 'वंदे मातरम' वाजविण्याचा निर्णय घेतल्याबद्दल पत्रकारांनी विचारणा केली असता, त्यावर सडकून टीका करताना त्या म्हणाल्या की, काँग्रेसला आपले स्वतःचे संविधान निर्माण करायचे आहे.

याच संवादादरम्यान, केरळमध्ये काँग्रेस नेते रमेश चेन्निथला यांनी तिरंग्याच्या आकाराचा केक कापल्याच्या घटनेबाबतही अमृता फडणवीस यांना त्यांचे मत विचारण्यात आले. यावर अधिक बोलणे टाळत आणि सावध भूमिका घेत त्या म्हणाल्या की, तिरंग्याच्या वापराबाबतची कायदेशीर तरतूद आपल्याला माहीत नाही. ही तरतूद पाहूनच यावर भाष्य करायला हवे.

दरम्यान, यावेळी जंतर मंतरवर झालेल्या आंदोलनाबद्दल विचारले असता अमृता फडणवीस म्हणाल्या, जंतर मंतरवर आंदोलनाला सुरुवात झाली ती नीट पेपरफुटीच्या प्रश्नावर. ही सुरुवात चांगली होती. पण त्यात नंतर समाजविरोधी आणि नको असलेले घटक सामील झाले आणि त्यांनी गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली. त्यामुळे आंदोलन काहीसे भरकटले. हे आंदोलन केवळ विद्यार्थ्यांच्या प्रश्नापुरतेच मर्यादित राहिले असते, तर चांगले झाले असते. आता नीटच्या बाबतीत सरकारने पावले उचलली आहेत, त्यावर कार्यवाही सुरू आहे.

## मुंबईत १० कोटींचा चरस जप्त

**मुंबई :** मुंबई गुन्हे शाखेच्या अंमली पदार्थ विरोधी कक्षाच्या वरळी युनिटने मोठी कारवाई करत सुमारे 10 कोटी 9 लाख रुपयांचा चरस जप्त केला आहे. या कारवाईत एका संशयिताला ताब्यात घेण्यात आले असून त्याच्याकडून तब्बल 10 किलो 10 ग्रॅम चरस हस्तगत करण्यात आला आहे. मुंबईत अंमली पदार्थांची तस्करी आणि विक्री करणाऱ्यांविरोधात सुरू असलेल्या कारवाईदरम्यान ही मोठी कारवाई करण्यात आली. गुन्हे शाखेने दिलेल्या माहितीनुसार, 17 ऑगस्ट 2026 रोजी दुपारी 2.20 ते सायंकाळी 5 वाजण्याच्या दरम्यान ही कारवाई करण्यात आली. वरळी युनिटच्या पथकाला मुंबई शहरात अंमली पदार्थांची खरेदी-विक्री, पुरवठा आणि साठा करणाऱ्यांचा शोध घेत असताना संशयास्पद हालचालींची माहिती मिळाली होती. त्यानंतर पथकाने कारवाई करत संबंधित संशयिताला ताब्यात घेतले. या कारवाईत पोलिसांनी 10 किलो 10 ग्रॅम वजनाचा चरस जप्त केला. जप्त करण्यात आलेल्या या अंमली पदार्थाची किंमत अंदाजे 10 कोटी 9 लाख रुपये असल्याचे प्रसिद्धिपत्रकात नमूद करण्यात आले आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात चरस सापडल्याने मुंबईतील अंमली पदार्थ तस्करीच्या नेटवर्कवर पुन्हा एकदा प्रश्न उपस्थित झाले आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वांद्रे टर्मिनसजवळ, बांद्रा पूर्व, मुंबई परिसरात ही कारवाई करण्यात आली. अंमली पदार्थांची तस्करी, विक्री किंवा साठवणूक करणाऱ्यांविरोधात गुन्हे शाखेच्या अंमली पदार्थ विरोधी कक्षाकडून विशेष मोहीम सुरू आहे. त्याच मोहिमेचा भाग म्हणून वरळी युनिटने ही कारवाई केली. या प्रकरणी संबंधित संशयिताविरोधात अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये (एनडीपीएस कायदा) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास गुन्हे शाखेकडून सुरू आहे. पोलिसांनी एवढ्या मोठ्या प्रमाणात चरस कुठून आणण्यात आला, तो मुंबईत कोणाला वितरित केला जाणार होता आणि या प्रकरणामागे आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा तपास सुरू केला आहे. त्यामुळे या कारवाईतून मुंबईतील अंमली पदार्थ तस्करीच्या मोठ्या साखळीचा पर्दाफाश होण्याची शक्यता आहे. या कारवाईसाठी मुंबईचे पोलीस आयुक्त देवेन भारती, पोलीस सहआयुक्त (गुन्हे) अनिल कुंभारे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) कृष्णकांत उपाध्याय, पोलीस उपायुक्त पौर्णिमा चौगुले-श्रींगी तसेच अंमली पदार्थ विरोधी कक्षातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने काम केले. वरळी युनिटचे प्रभारी पोलीस निरीक्षक संतोष साळुंखे, सहाय्यक पोलीस निरीक्षक किरण वाघ आणि त्यांच्या पथकाने ही कारवाई केली असल्याचे गुन्हे शाखेच्या प्रसिद्धिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

## सातारा पालकमंत्रिपदाचा निर्णय फडणवीस-पवारांच्या कोर्टात

**सातारा :** सातारा जिल्ह्याच्या पालकमंत्रिपदावरून महायुतीच्या राजकीय वर्तुळात सुरू असलेल्या चर्चांना मंत्री शंभूराज देसाई यांनी सावध भूमिका घेत नवे वळण दिले आहे. साताऱ्याचा पालकमंत्री कोण असावा, याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि दोन्ही उपमुख्यमंत्री घेतील आणि त्यांचा निर्णय आपल्याला मान्य असेल, असे देसाई यांनी स्पष्ट केले. त्यामुळे पालकमंत्रिपदावर कोणताही थेट दावा न करता त्यांनी निर्णयाची संपूर्ण जबाबदारी महायुतीच्या वरिष्ठ नेतृत्वावर सोपवली आहे.

पालकमंत्रिपदाच्या वाटपावरून महायुतीतील घटक पक्षांमध्ये वेगवेगळ्या चर्चा सुरू असताना देसाई यांचे हे वक्तव्य महत्त्वाचे मानले जात आहे. सातारा जिल्ह्यातील राजकीय समीकरणे, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणि महायुतीतील अंतर्गत समन्वय या पार्श्वभूमीवर पालकमंत्रिपदाचा निर्णय राजकीयदृष्ट्या महत्त्वाचा ठरणार आहे. पालकमंत्रिपदाबाबत बोलताना शंभूराज देसाई यांनी कोणतीही आक्रमक भूमिका घेण्याऐवजी वरिष्ठ नेतृत्वाच्या निर्णयाला प्राधान्य दिले. कोणत्या जिल्ह्याचा पालकमंत्री कोण असावा, याचा निर्णय घेण्याचा अधिकार मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना आहे. त्यांच्या अधिकारकक्षेबाबत भाष्य करणे आपल्याला योग्य वाटत नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार हे पालकमंत्रिपदाबाबत अंतिम निर्णय घेतील, असा स्पष्ट संदेश देसाई यांच्या भूमिकेतून मिळत आहे. त्यामुळे साताऱ्याच्या पालकमंत्रिपदासाठी कोणत्या नेत्याचे नाव पुढे येते, याकडे आता जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

सातारा जिल्हा परिषद निवडणुकीच्या राजकारणावरून महायुतीतील घटक पक्षांमध्ये निर्माण झालेल्या मतभेदांबाबतही देसाई यांना प्रश्न विचारण्यात आला. यावर त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दालनात यासंदर्भात बैठक झाल्याचे सांगितले. या बैठकीत नेमकी कोणती चर्चा झाली, याचा तपशील जाहीर करणे योग्य ठरणार नसल्याचे देसाई यांनी स्पष्ट केले. मात्र, बैठकीनंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनीच संबंधित वादावर पडदा पडल्याचे स्पष्ट केले होते, असे त्यांनी नमूद केले. त्यामुळे सातारा जिल्ह्यात महायुतीतील घटक पक्षांमध्ये स्थानिक पातळीवर मतभेद असले तरी वरिष्ठ पातळीवर त्यावर तोडगा काढण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे स्पष्ट होत आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १९ ऑगस्ट २०२६


# जिंतूर शहरातील नागरिकांच्या विविध यांचा तातडीने सोडवा




**जिंतूर (बी.डी.रामपूरकर) :** शहरातील नागरिकांना भेडसावणाऱ्या विविध प्रशासकीय समस्यांबाबत साखर सम्राट मध्यवर्ती बँकेच्या संचालक भावनाताई बोर्डीकरयांनी तहसीलदार यांना मागणी केली. यांच्या समवेत उपनगराध्यक्ष मोहसीन खान व नगरसेवक शेख अथर भाई यांच्या उपस्थितीत तहसीलदार मॅडम यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली.नागरिकांना शासकीय कागदपत्रे व विविध योजनांचा लाभ घेताना कोणत्याही प्रकारच्या अडचणींचा सामना करावा लागू नये, तसेच प्रलंबित कामे वेळेत पूर्ण व्हावीत, याबाबत प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले.यावेळी तहसीलदार मॅडम यांनी नागरिकांच्या समस्या गांभीर्याने घेत भविष्यात नागरिकांना अनावश्यक अडचणींचा सामना करावा लागणार नाही, याची हमी देत आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले.नागरिकांच्या प्रश्नांसाठी प्रशासनाशी सातत्याने पाठपुरावा केला जाईल...यावेळी उपनगराध्यक्ष, नगरसेवक शेख अथर भाई उपस्थित होते.

# जीवन विकास ग्रंथालयात 'डोहाच्या काठाशी' चे सादरीकरण

**छत्रपती संभाजीनगर :** दिवंगत लेखक श्रीनिवास विनायक कुलकर्णी यांच्या डोह पुस्तकावर आधारित 'डोहाच्या काठाशी' हा वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रम सोमवारी, दि. १७ ऑगस्टला जीवन विकास ग्रंथालयात सादर झाला.जीवन विकास ग्रंथालय, टिळक नगर, छत्रपती संभाजीनगरच्या वतीने 'वाचक व्यासपीठ' बैठकीचा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. हा उपक्रम दर सोमवारी सायंकाळी होणार आहे. या व्यासपीठाच्या दुसऱ्या बैठकीत हा कार्यक्रम झाला.श्रीकांत उमरीकर आणि सोहम पिंगळीकर यांनी कुलकर्णी यांच्या लेखनावरील भाष्यासह हे सादरीकरण केले. 'डोह' ची शैली गद्यकाव्याची आहे, अशी शैली नंतर फारशी वापरली गेली नाही, हे सांगताना श्री .उमरीकरांनी निसर्गाशी संबंधित इतर मराठी लेखनाचा आढावा घेतला. ललित गद्याकडे ताकदीच्या लेखकांनी पुरेसे लक्ष दिले नाही अशी खंत त्यांनी व्यक्त केली. 'डोह'च्या पहिल्या वैशिष्ट्यपूर्ण मुखपृष्ठाचा उल्लेखही उमरीकरांनी केला.आपल्या पिढीची तरूण मंडळी डोह या पुस्तकाकडे कशी पाहतात हे सांगताना सोहम पिंगळीकर यांनी युरोपातल्या इंप्रेशनिस्ट चळवळीचा उल्लेख केला. डोह मधलं लिखाण त्याच्याशी साधर्म्य असलेलं वाटतं, असं मत श्री. पिंगळीकर यांनी व्यक्त केलं. लेखक कुलकर्णी आणि त्यांचे दादा (वडील) यांच्यातील नात्यावर 'डोहावर वाकलेलं आकाश' हे सादरीकरण पिंगळीकर यांनी केलं त्याला जाणकार श्रोत्यांनी दिलखुलास दाद दिली.सुरवातीला सादरकर्त्यांचे स्वागत प्राचार्य जीवन देसाई आणि मनोज तुळपुळे यांनी केले. ग्रंथालयाचे अध्यक्ष न्या. अंबादासराव जोशी यांची महाराष्ट्र जन सुरक्षा अधिनियम अंतर्गत स्ल्लागार मंडळाचे अध्यक्ष म्हणून राज्य शासनाने नियुक्ती केली त्याबद्दल वाचक व्यासपीठाच्या वतीने सत्कार करण्यात आला. या बैठकीला जाणकार वाचक आणि श्रोते यांची चांगली उपस्थिती होती.

# कालिकादेवी विद्यालयात ,श्री वसंत आहेर सरांचा सेवापूर्ती गौरव सोहळा संपन्न





**शिरूर (प्रतिनिधी) :** आदर्श शिक्षण संस्था बीड द्वारा संचलित कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,शिरूर (का.)जि.बीड येथे,'विज्ञान विषयाचे श्री वसंत नारायण आहेर सर हे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत.त्यानिमित्त विद्यालयाचे प्राचार्य केशव भांगे साहेब यांनी श्री वसंत आहेर सरांच्या सेवापूर्तीचा गौरव सोहळा आयोजित केला होता.प्रारंभी लोकनेत्या स्व.केशरबाई (काकू) क्षीरसागर व स्व.सोनाजीराव (नाना) क्षीरसागर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.प्रमुख पाहुण्यांच्या सत्काराबरोबरच सत्कारमूर्ती श्री वसंत नारायण आहेर आणि त्यांच्या पत्नी सौ.जयश्री वसंत आहेर यांचा सपत्नीक कपड्यांचा आहेर, शाल, पुष्पहार,व श्रीफळ देऊन प्राचार्य केशव भांगे साहेब यांच्या हस्ते सत्कार करून त्यांच्या एकूण ३२ वर्षे सेवेचा गौरव करण्यात आला.कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य केशव भांगे साहेबांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून श्री आहेर सरांच्या प्रदीर्घ सेवेचा सन्मान व गौरव करताना सांगितले की, सरांनी विज्ञान हा विषय सहज, सोप्या भाषेत शिकवून अनेक विद्यार्थी घडवले.शिक्षण बरोबरच विद्यार्थ्यांना जीवनात यशस्वी होण्याची शिकवण दिली.आणि आपली सेवा यशस्वीपणे पूर्ण केली.यानंतर त्यांनी पुढील आयुष्याची वाटचाल योग्य दिशेने करावी.त्यासाठी त्यांना हार्दिक शुभेच्छा दिल्या.तर श्री आहेर सरांनी सत्काराला उत्तर देताना आपल्या सेवा काळातील विविध प्रकारचे अनुभव सांगितले.त्याचबरोबर स्व.काकू-नाना,माननीय अण्णासाहेब व प्राचार्य केशव भांगे साहेब यांचे,तसेच विद्यालयातील सर्व सहकाऱ्यांचे मनापासून आभार मानले.यावेळी उपप्राचार्य प्रा.बसवेश्वर देशमाने, उपमुख्याध्यापक सिद्धेश्वर शिंदे, पर्यवेक्षक जनार्दन काळे, विज्ञान प्रमुख,प्रा.संजय काकडे, परीक्षा प्रमुख प्रा.नामदेव तरकसे, प्रा.महारुद्र डोंगरे, प्रा.अशोक इनकर, प्रा.प्रशांत मळेकर, प्रा.संजय आव्हाड, प्रा.बिभिषण घायाळ, प्रा.विश्वास ढाकणे, प्रा.नारायण तांबे, प्रा.महादेव हांगे, प्रा.नारायण घोलप, प्रा.दत्ता गायकवाड, प्रा.घनश्याम चव्हाण, प्रा.लक्ष्मण गव्हाणे,प्रा.दत्ता शिंदे, प्रा.रविंद्र संकपाळे, प्रा.अशोक सवासे, प्रा.सुनिल मोरे, प्रा.हनुमंत घायाळ प्रा.शशिकांत जावळे, प्रा.बाळासाहेब खटाणे, प्रा.सविता दराडे, प्रा.रेखा निर्मळ, प्रा.सिमा ढवळे, श्रीमती अनिता लाटे, रविंद्र बडे, आप्पासाहेब कांबळे, विनायक सुरवसे, राजू बडे, रवी जोशी, नितीन बहिर,रविंद्र गव्हाणे, सुंदर शिंदे, आदिनाथ काशिद, सुनिल खेडकर, नंदकुमार जाधव, विलास कांबळे, गौतम भोसले,यांची विशेष उपस्थिती होती.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.विनोद गलांडे यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री जयेंद्र निकम यांनी केले.यावेळी कनिष्ठ प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १९ ऑगस्ट २०२६


## राज्यात १८३ ठिकाणी झाले एकल महिलांच्या हस्ते झेंडावंदन



**बीड /अंबाजोगाई (भगवंत पाळवदे) :** आमच्या साऊ एकल महिला समितीच्या वतीने आमच्या कार्यकर्त्यांनी वेगवेगळ्या जिल्ह्यात एकल महिलाना सन्मान देण्यासाठी एकल महिलांच्या हस्ते झेंडावंदन करावे यासाठी आवाहन केले होते. त्याला राज्यात प्रतिसाद मिळाला. एकूण १८३ ठिकाणी राज्यातील वेगवेगळ्या जिल्ह्यात एकल महिलांच्या हस्ते झेंडावंदन पार पडले. एकल महिलांना सन्मान दिला जातो आहे हे खूप आश्वासक आहे. या उपक्रमामागे एकल महिलांना गावांमध्ये सन्मानाची वागणूक मिळावी हाच हेतू आहे. एकल महिला अनेकदा घरातल्या कार्यक्रमातही सहभागी केल्या जात नाहीत. चांगले आवरून गावातील कोणत्याच कार्यक्रमालाही फारशा जात नाहीत. रूढी परंपरा यामुळे त्यांना सन्मानाने कार्यक्रमांमध्ये सहभागी केले जात नाही व त्याही सातत्याने बाजूला राहतात. याला छेद देण्यासाठी गावातील सर्वात महत्त्वाच्या कार्यक्रमात सर्वात महत्त्वाचा सन्मान त्यांना द्यावा असा यामागे प्रयत्न आहे. यावर्षी काही गावांनी हे करून दाखवले. एकल महिलांच्या हस्ते राष्ट्रीय ध्वजारोहण केलेल्या जिल्हानिहाय तपशील पुढील प्रमाणेसांगली १, अमरावती १, गडचिरोली १, परभणी २, हिंगोली १, गोंदिया १३, सातारा १३, वाशिम १८, धाराशिव १, अकोला ४, अहिल्यानगर १९, वर्धा ५, भंडारा ४, नंदुरबार ४, मुंबई ६, रायगड २, बीड १३, बुलढाणा १, सोलापूर १२, जालना २२, नांदेड ४, यवतमाळ ४, संभाजीनगर ६, धुळे ५, नाशिक १०, कोल्हापूर ३, नागपूर ४, पुणे ४ हेरंब कुलकर्णी- राज्य निमंत्रक- एकल महिला धोरण, महाराष्ट्र राज्य, तथा- मुख्यप्रवर्तक - साऊ एकल महिला महाराष्ट्र


प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क

9405109103


# सेवानिवृत्तीनंतरचे दुसरे पर्व

मित्रांनो, आज आपण वेगळा विषय घेऊन तुमच्यासमोर समरसपणे ठेवण्याचा प्रयत्न करणार आहे.सेवानिवृत्ती म्हणजे आयुष्याचा शेवट नव्हे, उलट ती आयुष्याच्या दुसऱ्या आणि अधिक अर्थपूर्ण पर्वाची सुरुवात आहे. नोकरीतून निवृत्त झाल्यानंतर हातातील काम थांबते, पद संपते, कार्यालयाची खुर्ची सुटते; पण अनुभव संपत नाही, विचार संपत नाहीत आणि समाजासाठी काही करण्याची ताकद संपत नाही.ज्यांचे शरीर धडधाकट आहे, मन प्रसन्न आहे आणि ज्यांच्याकडे आयुष्यभराच्या अनुभवाची शिदोरी आहे, त्यांनी निवृत्तीनंतर स्वतःभोवती भिंत उभी करण्याऐवजी समाजाकडे वळले पाहिजे. कारण देशाला केवळ तरुणांच्या शक्तीची गरज नाही; देशाला ज्येष्ठांच्या अनुभवाची, संयमाची आणि शहाणपणाचीही तितकीच गरज आहे.आज आपल्या समाजासमोर अनेक प्रश्न आहेत. शिक्षणापासून आरोग्यापर्यंत, पाण्यापासून पर्यावरणापर्यंत, बेरोजगारीपासून व्यसनाधीनतेपर्यंत अनेक आव्हाने आहेत. या प्रश्नांकडे केवळ सरकारने पाहावे, अशी अपेक्षा ठेवून आपण मोकळे होऊ शकत नाही. समाजातील सुशिक्षित, अनुभवी आणि सक्षम नागरिकांनी पुढे आले पाहिजे.सेवानिवृत्त व्यक्तींनी आपल्या गावातील एखादा प्रश्न स्वीकारावा. एखाद्या गरीब विद्यार्थ्याच्या शिक्षणाची जबाबदारी घ्यावी. एखाद्या शाळेला पुस्तके द्यावीत. एखाद्या तरुणाला कौशल्य शिकवावे. एखाद्या शेतकऱ्याला आधुनिक शेतीची माहिती द्यावी. एखाद्या गावाला पाणी वाचवण्याचा मार्ग दाखवावा. कुठे अन्याय होत असेल तर त्याविरुद्ध आवाज उठवावा आणि कुठे माणुसकीची गरज असेल तिथे धावून जावे.झाड म्हणजे भविष्यासाठी लिहिलेली प्रेमाची चिठ्ठीसेवानिवृत्तीनंतर प्रत्येक व्यक्तीने आपल्या आयुष्यात काही झाडे लावण्याचा संकल्प केला तर त्याचा परिणाम पुढील पिढ्यांना मिळेल. आपण लावलेले झाड कदाचित आपल्या आयुष्यात पूर्ण वाढलेले दिसणार नाही; पण आपल्या नातवंडांना त्याची सावली मिळेल.झाड लावणे म्हणजे केवळ पर्यावरणाचे काम नाही. ते भविष्यातील पिढीवर केलेले प्रेम आहे.त्याचबरोबर जलसंवर्धन हे आजच्या काळातील सर्वात मोठे सामाजिक कार्य आहे. पावसाचे पाणी अडवणे, जमिनीत मुरवणे, बंधारे बांधणे, शेततळी तयार करणे, विहिरींचे पुनर्भरण करणे आणि गावातील पाण्याचा प्रत्येक थेंब जपणे.या कामात ज्येष्ठांनी पुढाकार घ्यावा.आपल्या अनुभवातून गावकऱ्यांना एकत्र करून एखादे छोटे जलसंवर्धनाचे काम उभे केले, तरी त्याचे मोल मोठे आहे.शिक्षणासाठी पुढे यासमाज बदलायचा असेल तर शिक्षणापेक्षा प्रभावी साधन दुसरे नाही.आजही अनेक मुलांना आर्थिक अडचणींमुळे शिक्षण सोडावे लागते. एखाद्या विद्यार्थ्याची फी, पुस्तके, गणवेश किंवा वसतिगृहाचा खर्च भागविणे हे केवळ आर्थिक साहाय्य नाही; ते एका आयुष्याला दिशा देणे आहे.सेवानिवृत्त शिक्षकांनी गरीब मुलांना मोफत शिकवावे. डॉक्टरांनी आरोग्य मार्गदर्शन करावे. अभियंत्यांनी तरुणांना तांत्रिक मार्गदर्शन करावे. शेतकऱ्यांनी शेतीचे अनुभव द्यावेत. बँक कर्मचारी आर्थिक साक्षरता शिकवू शकतात. प्रशासकीय अधिकारी स्पर्धा परीक्षेच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करू शकतात.आपल्याकडे जे ज्ञान आहे ते आपल्या मृत्यूनंतर आपल्या सोबत जाऊ नये; ते पुढच्या पिढीकडे हस्तांतरित झाले पाहिजे.उत्पन्नातील दोन टक्के समाजासाठीमाझ्या मनात एक साधी कल्पना आहे,ज्याला शक्य आहे त्याने आपल्या उत्पन्नातील किमान दोन टक्के हिस्सा समाजासाठी बाजूला ठेवावा.ही रक्कम मोठी असण्याची गरज नाही. मन मोठे असणे महत्त्वाचे आहे.कोणालाशाळेत, अनाथ मुलांच्या शिक्षणासाठी, वृक्षारोपणासाठी, जलसंवर्धनासाठी किंवा एखाद्या गरजू कुटुंबासाठी मदत करावीशी वाटत असेल, तर मन जिथे टेकते तिथे ही रक्कम खर्च करावी.कारण पैसा बँकेत ठेवला तर तो आपल्या खात्यात राहतो; पण माणसासाठी खर्च केला तर तो इतिहासात जमा होतो.भिंतीवरचा पुरस्कार की इतिहासातील सुवर्णाक्षर?सेवानिवृत्तीनंतर अनेकांना पुरस्कार मिळतात. सन्मानपत्रे मिळतात. शाल, श्रीफळ मिळते. ट्रॉफी मिळतात. काही पुरस्कार घराच्या भिंतीवर सुंदर दिसतात; पण खरी कमाई त्या भिंतीवर नसते.खरी कमाई असते एखाद्या विद्यार्थ्याच्या डोळ्यातील आत्मविश्वासात,एखाद्या शेतकऱ्याच्या हिरव्या शिवारात,एखाद्या गावाच्या भरलेल्या विहिरीत,एखाद्या झाडाच्या सावलीत,एखाद्या गरिबाच्या चेहऱ्यावरील समाधानातआणि आपल्या मदतीमुळे उभ्या राहिलेल्या माणसाच्या यशात.आपण आपल्या आयुष्यात एखादा सुवर्ण अलंकार कमावला पाहिजे.तो सोन्याचा नसावा,तो माणुसकीचा असावा.एक दिवस आपण या जगातून निघून जाणार आहोत. आपल्या घराच्या भिंतीवर लटकणारे पुरस्कार तिथेच राहतील. आपली संपत्तीही इथेच राहील. पण आपण किती माणसे उभी केली, किती झाडे लावली, किती पाणी वाचवले, किती मुलांना शिक्षण दिले आणि किती दुःखी माणसांच्या डोळ्यातील अश्रू पुसले,याची आठवण मात्र समाजाच्या इतिहासात राहील.म्हणूनच माझे सेवानिवृत्त बांधवांना मनापासून आवाहन आहे सेवानिवृत्त होऊ नका.फक्त नोकरीतून निवृत्त व्हा.समाजसेवेतून निवृत्त होऊ नका.माणुसकीतून निवृत्त होऊ नका.विचारांतून निवृत्त होऊ नका.देशसेवेतून निवृत्त होऊ नका.तुमच्याकडे वेळ आहे, अनुभव आहे, शहाणपण आहे आणि अजूनही धडधाकट शरीर आहे. मग या उरलेल्या आयुष्याला केवळ आरामाची नाही, तर अर्थपूर्ण जगण्याची दिशा द्या.कारण आयुष्य किती वर्षांचे होते, यापेक्षा आपल्या आयुष्यामुळे किती माणसांचे जीवन सुंदर झाले, हा खरा प्रश्न आहे.सेवानिवृत्तीच्या दिवशी घड्याळ थांबत नाही; उलट समाजासाठी वेळ सुरू होतो.चला, या दुसऱ्या पर्वाची सुरुवात करूया.एक झाड लावूया.एक थेंब वाचवूया.एक विद्यार्थी घडवूया.एक गरजू हात धरूया.आणि आपल्या जगण्याला माणुसकीचा अर्थ देऊया..


**भूमिपुत्र वाघ**

**मो.** 91729 72482



प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राधान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १९ ऑगस्ट २०२६


## शिक्षक आमदार विक्रम काळे यांच्या अध्यक्षतेखाली शिक्षक दरबाराचे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर :** विभागाचे शिक्षक आमदार विक्रम काळे यांच्या मार्गदर्शनाखाली बुधवार, दिनांक 19 ऑगस्ट रोजी चार वाजता जुने शिक्षण उपसंचालक कार्यालय, देवगिरी महाविद्यालयाजवळ, छत्रपती संभाजीनगर येथे आयोजन करण्यात आले आहे. या शिक्षक दरबारात जिल्ह्यातील प्राचार्य, प्राध्यापक, मुख्याध्यापक व शिक्षक बंधू भगिनी, शिक्षकेत्तरकर्मचारी यांच्या प्रलंबित अडचणी लक्षात घेऊन त्या समस्याचे निराकरण करण्याच्या उद्देशाने या दरबाराचे आयोजन करण्यात आले आहे. या दरबारात शिक्षक आमदार विक्रम काळे हे स्वतः उपस्थित राहून शिक्षकांचे प्रश्न समजून घेऊन दरबारात उपस्थित छत्रपती संभाजीगर विभागाचे शिक्षण उपसंचालक, जिल्हा परिषदेचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाधिकारी व त्यांच्या अधिनस्त सर्व अधिकारी प्रलंबित प्रकरणाचे निरकरण करतील. शिक्षक दरबारात सोडवले जाणारे प्रश्न प्रलंबित वेतन व सेवा सुविधा प्रश्न, बदली, पदोन्नती व जुनी पेन्शन ,शाळेच्या मान्यता व प्रशासकीय प्रश्न, शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या विविध अडचणी व इतर सर्व प्रशासकीय प्रलंबित प्रश्न या दरबारात निकली काढण्यासाठी योग्य कार्यवाही करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त शिक्षकांनी सहभाग घ्यावा असे आव्हान राष्ट्रवादी शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष प्रदीप विखे, राष्ट्रवादी शिक्षक संघ प्राथमिक विभागाचे जिल्हाध्यक्ष एम. एम. खुटे , राष्ट्रवादी शिक्षक संघ महिला आघाडी जिल्हाध्यक्षा आशा डांगे ,रमाकांत छडीदार ,वाहेद शेख ,आरेफ शेख, विलास उमाप , अकिल पठाण, गोविंद गायकवाड, रमेश ठाकूर, योगेश गायकवाड, अविनाश काळे,प्रशांत मरकड, गजानन मोघे, सुधीर भोसले, किरण निकम, राजेंद्र दौंड , विजय ठाकूर, कृष्णा पाटील आदींनी केले आहे.

## साप आपले शत्रु नाहीत तर निसर्गाचे व आपले मित्र आहे - सर्पमित्र गणेश सोनसळे



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** पहिला श्रावण सोमवार व नागपंचमी निमित्त, ' चला करूया सापांशी मैत्री ' असा कार्यक्रम घेण्यात आला. यात्रसंगी अध्यक्ष म्हणून ज्येष्ठ शिक्षक शिवाजी सोमोसे तर प्रमुख पाहुणे म्हणून शालेय समिती सदस्य प्रसाद खेर्डेकर, सर्पमित्र गणेश सोनसळे, लखन फुफाटे, देवानंद लिंबाळकर, दिपक कुंभार, ऋषिकेश तिळकर आदि उपस्थित होते. विद्यार्थ्यांची नागांची, सापांची भिती दूर करण्यासाठी संस्कार आज सर्पमित्रांनी, 'साप आपले मित्र' हा कार्यक्रम आयोजित केला.यात सर्पमित्र गणेश सोनसळे व त्यांच्या सहकार्यांनी विषारी व बिनविषारी सापांविषयी माहिती सांगितली. त्याबरोबरच विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांची उत्तरे दिली. शंकानिरसन केले.आणि जे साप पाहिल्यावर आपण घाबरतो ते आज साप १ ली ते ९ वी तील विद्यार्थ्यांनी सर्पमित्रांच्या मदतीने हाताळले, त्याना हातात घेतले. त्यामुळे त्यांची भिती दूर झाली. परंतु सर्पमित्रांनी व शिक्षकांनी त्या चेतावणी पण दिली कि, साप दिसल्यावर त्याला पकडायचा प्रयत्न करू नका किंवा मारायचा प्रयत्न करू नका. तर सर्पमित्रांना फोन करा. अतिशय उत्साहात व आनंदमय वातावरणात आज विद्यार्थ्यांनी अनोखी नागपंचमी साजरी केली. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्कार केंद्रातील सर्व शिक्षकवृंद प्राथमिक व माध्यमिक विद्यालय व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## घर दोघांचे असावे

घर दोघांनी मिळून
आनंदाने चालवावे
पत्नी रुसता हळूच
पती तिला हसवावे..१

पती रुसता पत्नीने
खुणवावे हळुवार
स्वप्न सुंदर पडता
सांगणार बारबार...२

छान सुंदर संपन्न
घर दोघांचे असावे
सदा प्रेमाने पाहत
सखी समोर बसावे.३

घर असावे दोघांचे
सदा सर्वदा आनंदी
प्रेम करत बसावे
दोघे मिळून स्वच्छंदी.४

होई संसार सुखाचे
दोन जीवांचे साकार
येता चर्चेला उधाण
मिळे प्रेमाला आकार.५

घर असावे सुंदर
सुख दोघांना मिळावे
जग जिंकले प्रेमात
साऱ्या जगास कळावे.६



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

## द्रौपदी तुला हिणवले गेले का?

द्रौपदी,
तुला पतिव्रतेच्या तराजूत
तोलताना
कुणी विचारलं होतं का—
तुला किती पती हवे होते?

तुझ्या आयुष्याचा निर्णय
सभेत बसलेल्या पुरुषांनी
घेतला,
आणि कलंक मात्र
तुझ्या कपाळावर लावला!

पाच पुरुषांच्या नावाशी
तुझं आयुष्य बांधलं,
पण तुझ्या मनाला
कुणी विचारलं नाही...

तुला पतिव्रता म्हणताना
धर्मग्रंथांनी
तुझ्या इच्छेची
एक ओळ तरी वाचली होती
का?

तुझं वस्त्रहरण झालं,
सभागृह गप्प राहिलं;
तुझ्या देहावर हात
टाकणाऱ्यांना
धर्म आठवला नाही,
पण तुझ्या चारित्र्याची
चौकशी मात्र शतकानुशतके
सुरू राहिली!

द्रौपदी,
तुझा अपराध एवढाच—
तू प्रश्न विचारलास!

तू मान झुकवली नाहीस,
तू अन्यायाला
धर्माचं नाव देऊ दिलं
नाहीस.

म्हणूनच कदाचित
तुझ्या केसांपेक्षा
तुझा आवाज
पुरुषसत्तेला अधिक भयंकर
वाटला.

आजही
एखाद्या स्त्रीच्या आयुष्याचा
निर्णय
पुरुष घेतात,
आणि तिच्या चारित्र्याचा
हिशेबही पुरुषच मागतात.

म्हणून सांग द्रौपदी—
तुला पतिव्रता म्हणून
हिणवलं तर नाही ना?

कारण मला वाटतं,
तू पतिव्रतेच्या चौकटीतली
स्त्री नव्हतीस...

तू प्रश्न विचारणारी स्त्री
होतीस,
अन्यायाच्या डोळ्यात डोळे
घालून
"हा धर्म आहे का?"
असं विचारणारी
पहिली विद्रोही स्त्री होतीस!

**डॉ. बाळासाहेब लिहिणार**
**छत्रपती संभाजीनगर**


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस
डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिग
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद
8956362639, 8087880274, 9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १९ ऑगस्ट २०२६


## 'प्रकाशित व्हा...! या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला वाव मिळतो

**कन्नड :** डॉ. भीमराव आंबेडकर कनिष्ठ महाविद्यालय, कन्नड येथे विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला, कल्पकतेला व नेतृत्वगुणांना चालना देणारा 'प्रकाशित व्हा...! Be Bright...!' हा भिंतीपत्रक उपक्रम सन 2012 पासून सातत्याने राबविण्यात येत आहे. विविध विषयांवर विद्यार्थ्यांना थीम देऊन त्यांच्याकडून आकर्षक व माहितीपूर्ण पोस्टर तयार करून घेतले जातात.2026-27 या शैक्षणिक वर्षातील पहिल्या भिंतीपत्रकाचे प्रकाशन प्राचार्य डॉ. व्ही. एन. भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत बारावीतील कु. गुंजन सचिन मोरे व चि. संदीप साईनाथ गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी प्राचार्य डॉ. विजय एन. भोसले सर म्हणाले की, "विद्यार्थ्यांची सृजनशीलता, कल्पकता व आत्मविश्वास वाढविण्यासाठी हा उपक्रम अत्यंत महत्त्वपूर्ण असून, त्यांच्या सुप्त गुणांना प्रभावी व्यासपीठ मिळते." भिंतीपत्रकाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध विषयांचे ज्ञान, करिअरच्या दिशा व रोजगाराच्या संधींबाबत माहिती मिळत असून, वाचन-लेखन संस्कृती विकसित होण्यासही मदत होते.प्रा. जयंत रनाळकर यांच्या संकल्पनेतून सुरू झालेला हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त ठरत आहे.आज त्यांची जयंती त्यानिमित्त त्यांना या उपक्रमातून कृतिशील अभिवादन करण्यात आले.यावेळी उपप्राचार्य प्रा. अभय आहेर, उपक्रम प्रमुख डॉ. प्रकाश खेत्री, तसेच प्रा. जीवन भुसारे,प्रा.वाय.जी. सोमवंशी , प्रा. अनिल तेलुरे, प्रा. अमोल सरवदे आदी उपस्थित होते.या भिंतीपत्रकासाठी यश कोळी, रेहान शेख, समीर पठाण, चेतन राठोड, गुंजन मोरे, विशाल ठाकरे, वैष्णवी राठोड, जाहीद शेख, आबिद शेख व हर्षली गोसावी या विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर आकर्षक पोस्टर तयार केले.

## अरुण थोरात बनले कन्नड तालुक्यातील प्रथम मोडीलिपी तज्ञ



**छत्रपती संभाजीनगर :** पुराभिलेख संचालनालय महाराष्ट्र शासन आयोजित मोडीलिपी प्रशिक्षण पुर्ण करुण परिक्षा प्रथमश्रेणीत उतीर्ण झाल्यामुळे कळंकी ता.कन्नड येथील रानकवी,पत्रकार, ईतिहास अभ्यासक अरुण आप्पाराव थोरात हे कन्नड तालुक्यातील पहिले मोडीलिपी अनुवादक तज्ञ ठरले आहेत.चाळीसगाव येथील नानासाहेब य.ना. चव्हाण महाविद्यालय येथे पुराभिलेख संचालनालयाच्या वतीने दहा दिवसीय मोडीलिपी प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. यात 59 प्रशिक्षणार्थींनी सहभाग घेतला. दि.09 ऑगस्ट रोजी 53 प्रशिक्षणार्थींनी परिक्षा दिली. दि.18 ऑगस्ट रोजी परिक्षेचा निकाल घोषीत करण्यात आला. यात परिक्षा केंद्रातील 34 विद्यार्थी उत्तीर्ण झाले, अरुण थोरात यांनी प्रथमश्रेणी चे गुण मिळवून केंद्रात तिसरा क्रमांक मिळविला.याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. देशमुख, संचालक सुनिल देशमुख प्रशिक्षण संयोजक उपप्राचार्या डॉ. पी.एस. पाडवी, ईतिहास विभागप्रमुख प्रा.कल्पतेश देशमुख, पुराभिलेख चे प्रशिक्षक अमोल मोहळकर, भरत गवळी, यांसह शिवाजी महाविद्यालय कन्नड चे प्राचार्य डॉ. विजय भोसले, ईतिहास विभागप्रमुख डॉ. जगदिश भेलोंडे, तिफणकार डॉ. शिवाजी हुसे, भाजप संभाजीनगर जिल्हाध्यक्ष संजय खंबायते, जेष्ठ विधीज्ञ कृष्णा पाटील जाधव, मा.उपनगराध्यक्ष डॉ. सदाशिव पाटील, जेष्ठ नेते बबनराव बनसोड, ज्ञानेश्वर गायके, प्रविण दाभाडे, हिरिष थोरात आदींनी अभिनंदन केले आहे.

## प्रा. शाळा, कंटेकूर येथे ओम शांती ओम तर्फे नशामुक्त भारत अभियान शपथ कार्यक्रम



**कंटेकूर/मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** नशामुक्त भारताच्या संकल्पनेला बळ देण्यासाठी ओम शांती ओम माध्यमातून मार्गदर्शक श्री. राजेश भाई आणि विष्णू चव्हाण यांच्या वतीने नशामुक्त भारत अभियान अंतर्गत जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमातून विद्यार्थी, युवक व नागरिकांना व्यसनमुक्त जीवनाचे महत्त्व पटवून देण्यात आले. कार्यक्रमात व्यसनांचे व्यक्तीच्या आरोग्यावर, कुटुंबावर तसेच सामाजिक जीवनावर होणारे दुष्परिणाम याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तंबाखू, गुटखा, सिगारेट, मद्य तसेच इतर व्यसनांपासून दूर राहण्याचे आवाहन करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी "व्यसनमुक्त जीवन, निरोगी जीवन" शपथ सामूहिक घेण्यात आली व नशामुक्त भारत घडविण्याचा संकल्प केला. विद्यार्थ्यांनी व नागरिकांनी जनजागृतीपर संदेश देऊन समाजातील प्रत्येक घटकाने व्यसनमुक्तीच्या चळवळीत सहभागी होण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या माध्यमातून स्वतः व्यसनांपासून दूर राहूया आणि इतरांनाही व्यसनमुक्त जीवन जगण्यासाठी प्रेरित करूया, असा सकारात्मक संदेश देण्यात आला. कार्यक्रमास केंद्रप्रमुख बबिता महानुर, मुख्याध्यापक लक्ष्मीकांत पटणे, सरपंच विजयाताई जमादार, शिक्षक लतिफ लदाफ, जीवन सूर्यवंशी, चित्ररेखा दंडे, लक्ष्मीबाई शिकारे शिक्षक, पालक, नागरिक व ओम शांती ओमचे पदाधिकारी यांची उपस्थिती होती. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. प्रास्ताविक लक्ष्मण येवते यांनी केले तर आभार विजयकुमार कलशेट्टी यांनी मानले.





बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १९ ऑगस्ट २०२६


# मानवतेचा हातच संकटातील खरा आधार- डॉ. राजेंद्र बगाटे

दरवर्षी १९ ऑगस्ट हा दिवस 'जागतिक मानवतावादी दिन' म्हणून जगभर साजरा केला जातो. संकटाच्या काळात मानवतेची सेवा करणाऱ्या असंख्य कार्यकर्त्यांना अभिवादन करणे, युद्ध, नैसर्गिक आपत्ती, दुष्काळ, साथीचे रोग, विस्थापन, गरिबी आणि विविध मानवी संकटांमध्ये अडकलेल्या लोकांच्या वेदनांकडे जगाचे लक्ष वेधणे तसेच प्रत्येक मानवाच्या जीवनाचा आणि प्रतिष्ठेचा सन्मान करण्याचा संदेश देणे हा या दिवसाचा मुख्य उद्देश आहे. मानवतावाद म्हणजे केवळ संकटाच्या वेळी मदत करणे नव्हे, तर प्रत्येक व्यक्तीला माणूस म्हणून समान सन्मान, सुरक्षितता आणि जगण्याचा अधिकार आहे, ही जाणीव मनात दृढ करणे होय. संकटग्रस्तांच्या मदतीसाठी स्वतःचा जीव धोक्यात घालून काम करणाऱ्या मानवतावादी कार्यकर्त्यांचे योगदान या दिवशी विशेषत्वाने स्मरणात घेतले जाते. त्यामुळे जागतिक मानवतावादी दिन हा माणुसकीच्या सामर्थ्याचा, करुणेचा आणि सामाजिक उत्तरदायित्वाचा जागतिक जागर ठरतो.१९ ऑगस्ट २००३ रोजी बगदाद येथील संयुक्त राष्ट्रांच्या कॅनाल हॉटेलवरील बॉम्बस्फोटात २२ मानवतावादी कार्यकर्त्यांचा मृत्यू झाला; त्यांच्या स्मरणार्थ संयुक्त राष्ट्रांनी १९ ऑगस्ट हा 'जागतिक मानवतावादी दिन' म्हणून घोषित केला. हा दिवस संकटग्रस्तांच्या सेवेसाठी कार्य करणाऱ्या मानवतावादी कार्यकर्त्यांच्या धैर्याला आणि त्यागाला अभिवादन करण्याचा दिवस आहे.मानवतावादाची संकल्पना मुळात अत्यंत व्यापक आहे. दुसऱ्याच्या दुःखाची जाणीव होणे, त्याच्या वेदनेशी आपले भावनिक नाते जोडले जाणे आणि शक्य त्या पद्धतीने त्याच्या मदतीला धावून जाणे म्हणजे मानवतावाद. यात दया आणि सहानुभूतीबरोबरच समानता, न्याय, बंधुता आणि मानवी प्रतिष्ठेचा विचार अंतर्भूत आहे. एखादी व्यक्ती कोणत्या धर्माची आहे, कोणत्या जातीची आहे, तिची भाषा कोणती आहे, ती कोणत्या प्रदेशातून आली आहे किंवा तिची आर्थिक परिस्थिती काय आहे, याचा विचार न करता तिच्या संकटात मदतीचा हात पुढे करणे ही मानवतावादी वृत्ती होय. मानवतावाद माणसामाणसांतील कृत्रिम भेद ओलांडतो. म्हणूनच मानवतावाद हा कोणत्याही एका धर्माचा, देशाचा किंवा समाजाचा विचार नसून संपूर्ण मानवजातीला जोडणारे सार्वत्रिक मूल्य आहे.आजच्या जगाकडे पाहिले तर मानवतावादी कार्याची गरज किती मोठी आहे, हे सहज लक्षात येते. जगाच्या विविध भागांत युद्धे आणि सशस्त्र संघर्ष सुरू आहेत. लाखो लोकांना आपली घरे सोडून विस्थापित व्हावे लागत आहे. अनेक कुटुंबांचे उपजीविकेचे साधन नष्ट होत आहे. मुलांचे शिक्षण खंडित होत आहे. रुग्णालये आणि आरोग्यसेवा बाधित होत आहेत. अन्न, पाणी आणि औषधांची टंचाई निर्माण होत आहे. अशा परिस्थितीत सामान्य नागरिकांचे जीवन अत्यंत असुरक्षित होते. महिला, बालके, वृद्ध, दिव्यांग व्यक्ती आणि आजारी व्यक्तींना संकटाचा अधिक तीव्र परिणाम सहन करावा लागतो. त्यामुळे मानवतावादी मदत ही केवळ अतिरिक्त सुविधा नसून अशा परिस्थितीत जीवन वाचविण्यासाठी अत्यावश्यक व्यवस्था बनते.युद्धाच्या काळात मानवतावादी कार्याचे महत्त्व विशेष वाढते. युद्ध कोणत्याही कारणाने सुरू झाले असले तरी त्याची सर्वाधिक झळ सामान्य नागरिकांना बसते. घरांवर बॉम्बहल्ले होतात, रस्ते आणि पूल उद्ध्वस्त होतात, रुग्णालयांवर ताण वाढतो आणि मूलभूत सुविधा कोलमडतात. अशा वेळी मानवतावादी कार्यकर्ते अन्न, पाणी, औषधे, वैद्यकीय सेवा, निवारा आणि सुरक्षिततेशी संबंधित मदत पोहोचविण्याचे काम करतात. अनेक वेळा ते अशा प्रदेशांत काम करतात, जिथे स्वतःच्या जीवाला मोठा धोका असतो. तरीही मानवतेच्या सेवेसाठी ते आपले कर्तव्य पार पाडतात. म्हणूनच मानवतावादी कार्यकर्त्यांची सुरक्षितता ही संपूर्ण जगाची जबाबदारी आहे. मदतकार्य करणाऱ्या व्यक्तींवर हल्ले होणे म्हणजे मानवतेवरच हल्ला होय.मानवतावादी कार्य केवळ युद्धाच्या प्रदेशांपुरते मर्यादित नाही. नैसर्गिक आपत्तींच्या वेळीही त्याची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. पूर, भूकंप, चक्रीवादळ, भूस्खलन, दुष्काळ, अतिवृष्टी, उष्णतेच्या लाटा आणि जंगलातील आगी यांसारख्या आपत्तींमुळे हजारो कुटुंबांचे जीवन विस्कळीत होते. घरांचे नुकसान होते, पिके नष्ट होतात, जनावरे मृत्युमुखी पडतात आणि रोजगाराची साधने हिरावली जातात. अशा वेळी तातडीने अन्न, पाणी, कपडे, औषधे आणि निवारा उपलब्ध करून देणे आवश्यक असते. मात्र मदतकार्य केवळ तात्पुरत्या स्वरूपाचे न राहता पुनर्वसन आणि पुनर्निर्माणाशी जोडले गेले पाहिजे. आपत्तीग्रस्त व्यक्तीला पुन्हा स्वावलंबी बनविणे आणि तिच्या जीवनाला स्थैर्य मिळवून देणे हा मानवतावादी दृष्टिकोनाचा महत्त्वाचा भाग आहे.हवामानबदलामुळे मानवतावादी संकटांचे स्वरूप आणखी गुंतागुंतीचे झाले आहे. वाढते तापमान, अनियमित पाऊस, अतिवृष्टी, दीर्घकालीन दुष्काळ, चक्रीवादळे आणि इतर हवामानविषयक संकटांचा परिणाम समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांवर अधिक होतो. ग्रामीण भागातील शेतकरी, भूमिहीन कामगार, आदिवासी समुदाय, स्थलांतरित कामगार आणि गरीब कुटुंबे या संकटांना अधिक असुरक्षित असतात. त्यामुळे मानवतावादाचा विचार पर्यावरणीय न्यायाशी जोडणे आवश्यक झाले आहे. नैसर्गिक साधनसंपत्तीचे संवर्धन, शाश्वत विकास, आपत्तीपूर्व तयारी आणि स्थानिक समुदायांचे सक्षमीकरण यांचा मानवतावादी कार्यात समावेश झाला पाहिजे.भारतीय समाजाच्या परंपरेत मानवतावादाला फार मोठे स्थान आहे. संत परंपरेने माणुसकी, समता, बंधुभाव आणि करुणेचा पुरस्कार केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक न्याय, समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या मूल्यांवर आधारित समाजव्यवस्थेची भूमिका मांडली. भारतीय संविधानाची प्रस्तावनाही न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांवर समाजाची उभारणी करण्याचा संदेश देते. त्यामुळे आधुनिक मानवतावादाची मूल्ये भारतीय लोकशाहीच्या मूलभूत विचाराशी अतिशय जवळची आहेत.मानवतावादाचा केंद्रबिंदू म्हणजे मानवी प्रतिष्ठा होय. मदत करताना गरजू व्यक्तीकडे केवळ 'दयेचे पात्र' म्हणून पाहणे योग्य नाही. संकटग्रस्त व्यक्तीलाही स्वाभिमान, निर्णयक्षमता आणि अधिकार असतात. त्यामुळे मानवतावादी मदत ही सन्मानपूर्वक आणि गरजू व्यक्तीच्या गरजा लक्षात घेऊन दिली पाहिजे. अन्न किंवा कपडे देणे ही तातडीची गरज भागविणारी कृती असली तरी त्यापुढे जाऊन रोजगार, शिक्षण, आरोग्य, कौशल्यविकास आणि सामाजिक सुरक्षितता उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. मदत घेणाऱ्या व्यक्तीला पुन्हा स्वतःच्या पायावर उभे राहता येईल, अशी परिस्थिती निर्माण करणे हेच खरे सक्षमीकरण होय.मानवतावादी कार्यामध्ये स्वयंसेवी संस्था आणि स्थानिक समुदायांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. आपत्तीच्या वेळी सरकारी यंत्रणा मदतीसाठी प्रयत्नशील असते; परंतु प्रत्येक व्यक्तीपर्यंत तातडीने पोहोचणे नेहमी शक्य होत नाही. अशा वेळी स्थानिक स्वयंसेवक, सामाजिक संस्था, युवक मंडळे, महिला बचतगट, विद्यार्थी संघटना आणि समुदायाधारित संस्था महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यांना स्थानिक परिस्थिती, भाषा आणि गरजांची माहिती असल्यामुळे मदतकार्य अधिक परिणामकारक ठरते. संकटाच्या काळात समाजातील विविध घटकांनी एकत्र येऊन काम केल्यास उपलब्ध साधनसंपत्तीचा योग्य वापर होतो आणि अधिकाधिक लोकांपर्यंत मदत पोहोचविता येते.युवकांची भूमिका या संदर्भात विशेष महत्त्वाची आहे. युवकांमध्ये ऊर्जा, तंत्रज्ञानाचे ज्ञान आणि सामाजिक सहभागाची क्षमता मोठी असते. रक्तदान, अन्नवाटप, आपत्तीग्रस्तांना मदत, जनजागृती, स्वच्छता अभियान, आरोग्यशिबिरे आणि सामाजिक माध्यमांद्वारे मदतसंकलन अशा अनेक क्षेत्रांत युवक प्रभावी योगदान देऊ शकतात. शिक्षणसंस्थांनी विद्यार्थ्यांमध्ये केवळ ज्ञान आणि कौशल्ये विकसित न करता सामाजिक संवेदनशीलता, सहानुभूती आणि स्वयंसेवेची भावना निर्माण केली पाहिजे. शिक्षणाचे अंतिम उद्दिष्ट केवळ रोजगारप्राप्ती नसून जबाबदार आणि संवेदनशील नागरिक घडविणे हेही आहे.दिव्यांग व्यक्तींच्या संदर्भात मानवतावादी दृष्टिकोन अधिक संवेदनशील असणे आवश्यक आहे. आपत्तीच्या वेळी स्थलांतर, सुरक्षित निवारा, वाहतूक, आरोग्यसेवा आणि माहिती मिळविताना दिव्यांग व्यक्तींना अनेक अडचणी येऊ शकतात. म्हणून आपत्ती व्यवस्थापनाच्या योजना सर्वसमावेशक असणे आवश्यक आहे. माहिती सर्वांना समजेल अशा पद्धतीने उपलब्ध करणे, प्रवेशयोग्य निवारे तयार करणे, सहाय्यक साधने उपलब्ध करून देणे आणि आवश्यकतेनुसार प्रशिक्षित स्वयंसेवकांची मदत देणे ही समाजाची जबाबदारी आहे. मानवतावादाची खरी कसोटी समाजातील सर्वाधिक असुरक्षित व्यक्तीपर्यंत मदतीचा हात पोहोचतो की नाही, यात आहे.डिजिटल युगाने मानवतावादी कार्यासाठी नवीन संधी निर्माण केल्या आहेत. सामाजिक माध्यमांमुळे एखाद्या आपत्तीची माहिती काही क्षणांत जगभर पोहोचू शकते. डिजिटल निधीसंकलन, स्थाननिश्चिती तंत्रज्ञान, उपग्रहचित्रे, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि माहिती व्यवस्थापनाच्या आधुनिक साधनांमुळे मदतकार्य अधिक जलद आणि परिणामकारक करता येते. मात्र डिजिटल माध्यमांमध्ये चुकीची माहिती, अफवा आणि बनावट मदत आवाहनेही वेगाने पसरू शकतात. त्यामुळे माहितीची सत्यता तपासणे, पारदर्शकता राखणे आणि वैयक्तिक माहितीचे संरक्षण करणे आवश्यक आहे. तंत्रज्ञानाचा वापर मानवतेच्या सेवेसाठी झाला पाहिजे; मानवी असुरक्षिततेचा गैरफायदा घेण्यासाठी नव्हे.मानवतावादाचा संबंध सामाजिक न्यायाशीही आहे. संकट निर्माण झाल्यानंतर मदत करणे महत्त्वाचे आहे; परंतु समाजातील विषमता, गरिबी, बेरोजगारी, अशिक्षण, आरोग्यसेवेतील तफावत आणि सामाजिक बहिष्कार यांसारख्या संकटांच्या मूळ कारणांकडेही लक्ष दिले पाहिजे. जे समुदाय आधीपासूनच आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या दुर्बल आहेत, ते आपत्तीच्या काळात अधिक असुरक्षित होतात. म्हणून मानवतावादी कार्याबरोबर सामाजिक सक्षमीकरणाची प्रक्रिया राबविणे आवश्यक आहे. प्रत्येक व्यक्तीला शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि सामाजिक संरक्षणाची समान संधी मिळाली तर संकटांचा सामना करण्याची तिची क्षमता वाढते.जागतिक मानवतावादी दिन हा त्यामुळे केवळ मानवतावादी कार्यकर्त्यांना अभिवादन करण्याचा दिवस नाही; तो आपल्या सामाजिक संवेदनशीलतेची परीक्षा घेणारा दिवस आहे. आपल्या आसपास एखादा वृद्ध मदतीच्या प्रतीक्षेत आहे का, एखादे गरीब कुटुंब अडचणीत आहे का, एखाद्या विद्यार्थ्याला शिक्षणासाठी आधाराची गरज आहे का, एखाद्या दिव्यांग व्यक्तीला सामाजिक सहकार्याची आवश्यकता आहे का किंवा एखादा आपत्तीग्रस्त नागरिक मदतीची अपेक्षा करीत आहे का, याचा विचार करण्याची ही संधी आहे. मानवतावाद मोठ्या घोषणांमध्ये नसतो; तो छोट्या-छोट्या कृतींमध्ये जगतो. एखाद्याला पाणी देणे, रक्तदान करणे, जखमीला रुग्णालयात पोहोचविणे, संकटात असलेल्या व्यक्तीचे म्हणणे शांतपणे ऐकून घेणे किंवा अन्यायाविरुद्ध आवाज उठविणे, या कृतीही मानवतेच्या सेवाच आहेत.आज जग विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात वेगाने पुढे जात आहे; परंतु या प्रगतीला मानवी संवेदनशीलतेची जोड मिळाली नाही तर ती अपूर्ण राहील. उंच इमारती, वेगवान वाहतूक, आधुनिक तंत्रज्ञान आणि आर्थिक विकास यांना खरे मूल्य तेव्हाच प्राप्त होते, जेव्हा समाजातील प्रत्येक व्यक्ती सुरक्षित, सन्मानाने आणि आशेने जगू शकते. म्हणूनच मानवतावादी मूल्ये ही आजच्या जगाची गरज आहेत. संघर्षाऐवजी शांतता, द्वेषाऐवजी प्रेम, भेदभावाऐवजी समता, उदासीनतेऐवजी सहानुभूती आणि स्वार्थाऐवजी सहकार्य स्वीकारण्याची आवश्यकता आहे.१९ ऑगस्टचा जागतिक मानवतावादी दिन आपल्याला याच मूल्यांची आठवण करून देतो. संकटाच्या काळात मदतीचा हात पुढे करणारे मानवतावादी कार्यकर्ते हे जगाच्या सामूहिक सद्सद्विवेकबुद्धीचे प्रतीक आहेत. त्यांच्या कार्याचा सन्मान करण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे स्वतःच्या जीवनात मानवतेची मूल्ये रुजविणे. मानवतावाद हा एका दिवसापुरता मर्यादित राहू नये; तो आपल्या कुटुंबात, शाळेत, महाविद्यालयात, कार्यस्थळी आणि समाजजीवनात सतत आचरणात आणला पाहिजे. कारण माणुसकी जिवंत ठेवण्यासाठी मोठ्या पदाची किंवा संपत्तीची आवश्यकता नसते; आवश्यक असते ती दुसऱ्याच्या वेदनेची जाणीव आणि मदतीसाठी पुढे येण्याची तयारी.मानवतेचा खरा विजय तेव्हा होतो, जेव्हा संकटात सापडलेल्या व्यक्तीला आपण एकटे पडू देत नाही. तिच्या अश्रूंमध्ये आपले अश्रू मिसळण्याची, तिच्या वेदनेत सहभागी होण्याची आणि तिच्या अंधारात आशेचा दिवा पेटविण्याची तयारी ठेवतो. जागतिक मानवतावादी दिनाचा संदेश म्हणून आपण एवढेच लक्षात ठेवू या की, जग बदलण्याची सुरुवात मोठ्या घोषणांपासून नव्हे, तर एका माणसाने दुसऱ्या माणसासाठी पुढे केलेल्या मदतीच्या हातापासून होते. संकट कितीही मोठे असो, माणुसकीची शक्ती त्याहून मोठी असते. म्हणूनच मानवतेचा हात धरू या, करुणेची वाट चालू या आणि प्रत्येकाच्या सन्मानाने जगण्याच्या अधिकारासाठी संवेदनशील समाजाची निर्मिती करू या. हाच जागतिक मानवतावादी दिनाचा खरा संदेश आणि मानवजातीच्या उज्ज्वल भविष्याचा भक्कम पाया आहे.




**डॉ. राजेंद्र बगाटे, (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

**bagate.rajendra5@gmail.com**